


दैनिक
# आरंभपर्व
आवृत्ती : पुणे + सातारा + सांगली
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे **पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०१ ● अंक : २४५ ● शुक्रवार, दि. २१ जून २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 245 ● Friday, 21 June 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-



विज्ञान भारतीचे सहावे राष्ट्रीय अधिवेशन पुण्यात 3



दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम परिषदेला पुण्यात प्रारंभ 4

## ठळक बातम्या

### 'ससून'मधील गोंधळ संपेना!

**पुणे : (आरंभ पर्व)** :बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात अधिष्ठातापदाची संगीत खुर्ची सुरू आहे. तत्कालीन अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांना मे महिन्यात सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आल्यानंतर डॉ. चंद्रकांत म्हस्के यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. आता तीनच आठवड्यांत डॉ. म्हस्के यांच्याकडील कार्यभार काढून डॉ. एकनाथ पवार यांच्याकडे देण्यात आला आहे. यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील सावळागोंधळ समोर आला आहे.

### विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराला गती!

**पुणे : (आरंभ पर्व)** : पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पावले उचण्यास सुरुवात केली आहे. विमानतळाचे संयुक्त सर्वेक्षण करण्यास परवानगी देऊन धावपट्टी विस्ताराची शक्यता तपासण्यासाठी हवाई दलाला सूचना कराव्यात, अशी विनंती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना मोहोळ यांनी पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराला गती मिळण्याची चिन्हे आहेत. मोहोळ यांनी पत्रात म्हटले आहे की, भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची देशांतर्गत हवाई वाहतूक बाजारपेठ आहे. त्यातही पुणे विमानतळ हे देशातील व्यग्र विमानतळांच्या यादीत 9 व्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षी 80 लाखांहून अधिक प्रवाशांनी पुणे विमानतळावरून प्रवास केला.

# रीलसाठी लटकले इमारतीला

## कात्रज परिसरातील घटना : तरुण-तरुणीवर गुन्हा दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
रील बनविण्यासाठी तरुणी एका तरुणाचा हात धरून एका इमारतीवरून लटकल्याचा व्हिडिओ व्हायरल होताच, भारती विद्यापीठ पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. एका बंद इमारतीच्या छतावरून तरुण-तरुणीने धोकादायकरीत्या रील बनवला आहे. पुणे-बंगळूर महामार्गावरील कात्रज नव्या बोगद्याजवळील दरी पुलाजवळ या तरुणांनी रील शूट केला आहे. संगनमताने केलेला गुन्हा आणि अविचाराचे किंवा हयगयीचे कृत्य करून दुसऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण केल्याबद्दल तरुणांवर भारती विद्यापीठ पोलिसांनी



गुन्हा दाखल केला आहे.

एका जुन्या इमारतीवर हाताची पकड तपासण्यासाठी एक तरुणी तरुणाचा हात पकडून इमारतीवरून लटकल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. या दोघांसोबत तीन ते चार व्हिडिओग्राफरदेखील तेथे उपस्थित असल्याचे व्हिडिओवरून स्पष्ट होते. रील तयार करण्याच्या नादामध्ये एका तरुणीने आपला जीव गमावल्याची घटना नुकतीच छत्रपती संभाजीनगरमध्ये घडली आहे. कारमध्ये बसून रील बनवत असताना तरुणी कारसोबत दरीत कोसळली. या घटनेत तरुणीचा मृत्यू झाला आहे. दौलताबाद परिसरातील सुलीभंजन येथील दत्तमंदिराजवळ ही घटना घडली होती. हा प्रकार ताजा असतानाच अत्यंत धोकादायकपणे रीलचे शूट करण्यात येत असल्याचा प्रकार कात्रज परिसरात घडला.

हा व्हिडिओ पुणे-बंगळूर महामार्गाजवळील एका पडीक इमारतीवरून शूट करण्यात आला आहे. या इमारतीवर चढून तरुण आणि तरुणी स्टंटबाजी करताना दिसत आहेत.

'ग्रीप स्ट्रेंथ चेक' म्हणजेच हाताची पकड किती घट्ट आहे हे तपासण्यासाठी स्टंटबाजी करत असल्याचे कॅप्शनमध्ये लिहून हा व्हिडिओ पोस्ट करण्यात आला आहे. सुमारे दोन ते तीन मजली उंच इमारतीवरून ही तरुणी तरुणाचा हात पकडून अधांतरी लटकत असल्याचे दिसत आहे.

हा स्टंट शूट करणारे तरुणदेखील व्हिडिओत दिसत आहेत.


पूर्ण तयारीने हे चौघे इमारतीवर चढले होते, तर एक जण खालून शूटिंग करत आहे, असे व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे. अनेकांनी या व्हिडिओवरून संबंधित तरुण-तरुणीवर टीका केली आहे.

### या गुन्ह्यात काय शिक्षा होते?

या तरुणांवर भादंवि कलम ३४ आणि ३३६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संगनमताने केलेला गुन्हा आणि अविचाराचे किंवा हयगयीचे कृत्य करून दुसऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण केल्यानंतर या कलमांनुसार गुन्हा दाखल होत असतो. तीन महिने तुरुंगवास आणि २५० रुपये दंड किंवा दोन्ही असे या गुन्ह्याच्या शिक्षेचे स्वरूप आहे. हा गुन्हा जामीनपात्र असून, त्यात तडजोड करता येत नाही.

# पाण्याच्या टँकरमध्ये सापडला महिलेचा मृतदेह

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
घरांमधून निघून गेलेल्या महिलेचा मृतदेह पाण्याच्या टँकरमध्ये आढळून आल्याची घटना गुरुवारी (ता. 20) सकाळी उघडकीस आली. फुरसुंगी येथील पॉवर हाउसजवळ पाणी सोडत असताना हा प्रकार समोर आला. हा खून आहे की आत्महत्या, याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. कौशल्या मुकेश चव्हाण (वय 25, रा. दुगडचाळ, जेएसपीएम कॉलेजजवळ, हांडेवाडी) असे मृत महिलेचे नाव आहे. कौशल्या हरवल्याची तक्रार कोंढवा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. अधिक माहितीनुसार, पुरूषोत्तम नरेंद्र ससाणे (वय 27, रा. दुगडचाळ,




हांडेवाडी) यांचा पाण्याच्या टँकरचा व्यवसाय आहे. बुधवारी (ता. 19) दिवसभर पुण्याच्या विविध भागात टँकरने पाणी पोहोचविल्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास त्यांनी घराजवळ टँकर उभा केला. त्यानंतर ते घरी गेले. गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे त्यांनी टँकर बाहेर काढला. त्यानंतर त्यांनी रामटेकडी येथे पाणी भरले. टँकर घेऊन ते फुरसुंगी येथील पॉवर हाऊसजवळ असलेल्या एका घरी पाणी पोहोचविण्यासाठी गेले होते.

तेथील टाकीत पाणी सोडत असताना पाणी बाहेर येत नव्हते. त्यामुळे त्यांनी सुरुवातीला वॉल्व्ह तपासला. मात्र, पाणी येत नसल्याने त्यांनी पाइप काढून पाहिले असता, आतून साडी आल्याचे त्यांना दिसले. साडी कुठून आली, हे पाहण्यासाठी ते टँकरवर चढले असता, त्यांना पाण्यामध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला.

याबाबतची माहिती त्यांनी पोलिसांना कळवली. हडपसर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत हा मृतदेह बाहेर काढला. पंचनामा करून मृतदेह ससून रुग्णालयात पाठविण्यात आला. टँकरमध्ये महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.


> कौशल्या या कोणत्या कारणामुळे घरांमधून निघून गेल्या होत्या, याचा आम्ही शोध घेत आहे, तसेच हा खून आहे की आत्महत्या, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर त्याचा उलगडा होऊ शकतो.
> - संतोष पांढरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, हडपसर पोलिस ठाणे




# मोदींची गॅरंटी खोटी निघाली : शरद पवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महाराष्ट्रात आणि देशात असं दिसतंय की भाजप आणि मोदी सरकार यांच्याबद्दल लोकांच्या मनातील विश्वासाला तडा गेला आहे. मोदींच्या गॅरंटीवर लोकांचा आता विश्वास नाहीये, हे या लोकसभा निवडणुकीतून स्पष्ट झालं आहे. मोदींची गॅरंटी खोटी निघाली, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी टीकास्त्र सोडलं. लोकसभा निवडणुकीतील निकालानंतर भाजपची महाराष्ट्रात मोठी पिछेहाट झाली आणि केंद्रातही स्वबळावर सत्ता मिळवता आलेली नसून एनडीएचं सरकार स्थापन करण्यात आलं आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनही सरकारचे कान टोचण्यात आले होते.

राज्यात महाविकास आघाडीला चांगली मत आणि जागा मिळाल्या. त्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला असता, शरद पवार यांनी लोकांचा मोदींवर, सरकारवर विश्वास उरला नसल्याचे नमूद केले. मोदींनी जी आश्वासनं दिली होती ती गेल्या 5-10 वर्षांत त्यांनी पाळली नाहीत हे लोकांच्या लक्षात आलं. आणि लोकांना



बदल हवाय, त्यामुळे राज्यात हे चित्र दिसलं असं पवार म्हणाले.

या लोकसभा निवडणुकीत तुम्ही बघितलंत तर राज्यात आम्ही (मविआ) 30-31 जागा जिंकल्या. विधानसभेचं जर तुम्ही पाहिलं तर 155 मतदारसंघामध्ये आम्हा लोकांचा विजय झालेला आहे.

288 जागांची विधानसभा, त्यातला 155 मतदारसंघात विरोधकांना बहुमत मिळतं, याचा अर्थ भविष्यात विधानसभा निवडणुकीत लोकांचा मूड काय हे स्पष्ट होतं. त्यादृष्टीने पावलं टाकणं ही आमची जबाबदारी आहे, असंही पवार म्हणाले.


मी राष्ट्रवादी सोबत आहे, अजित दादांसोबत नाही, या छगन भुजबळ यांच्या वक्तव्याने आणि त्यांचा सध्याच्या एकंदर भूमिकेमुळेच ते शरद पवार गटासोबत पुन्हा जाणार का याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

त्यांच्या या विधानाचा अर्थ काय घ्यायचा, याबद्दल शरद पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता, त्यांनी स्पष्ट उत्तर दिलं.

त्यांच्या या विधानामागची पार्श्वभूमी काय हे मला माहीत नाही. माझी त्यांची वर्ष-सहा महिन्यांत भेट नाही. त्यामुळे त्यांच्या विधानबद्दल मला काही माहीत नाही असे शरद पवार म्हणाले. त्यांच्याकडून कोणताही संपर्क साधण्यात आलेल नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आधी लोकसभा नतर राज्यसभेसाठी उमेदवारी न मिळाल्याने भुजबळ नाराज असल्याची चर्चा सुरु होती. त्यानंतर त्यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे संभ्रमाची स्थिती निर्माण झाली असून भुजबळांचं पुढलं पाऊल काय असेल याबद्दल तर्क-वितर्क सुरु आहेत.

> 1967 साली मला कठीण काळात विजयी केलं. सोमेश्वर कारखान्याचे बाबलाल काकडे यांच्या विरोधात मला निवडून दिलं. मी नुकताच कॉलेज जीवनातून बाहेर आलो होतो. बारामतीमधील तरुण पिढीने मला नेहमीच साथ दिली. आजची निवडणूक ही सुप्रिया सुळे यांची चौथी निवडणूक असताना देखील प्रचंड मतांनी विजयी केलं. बारामती मधील जनतेला कोणतं बटन दाबायचं हे सांगावं लागत नाही. देशाचे पंतप्रधान दीड लाख मतांनी निवडून आले आणि सुप्रिया दीड लाखापेक्षा ज्यास्त मतांनी निवडून आल्या. देशाच्या पंतप्रधान यांच्यापेक्षा सुप्रिया सुळे ज्यास्त मतांनी निवडून आल्या, असं शरद पवार म्हणाले. शरद पवार यांच्या उपस्थितीत बारामतीमध्ये ठिकठिकामी जनसंवाद सभा आणि आयोजन करण्यात येत आहे. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, युगेंद्र पवार, उत्तम जानकरदेखील शरद पवारांसोबत आहे. या दौऱ्या दरम्यान शरद पवारांनी बारामती लोकसभा निवडणुकीवर भाष्य केलं. तसंच नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधलाय.







# वटपौर्णिमा हा स्त्रियांच्या गौरवाचा सण

आपल्या भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा हा कुटुंबवत्सल आहे. पत्नी आपल्या पतीसाठी एखादी पूजा करते, त्याच्यासाठी शुभ विचार करते. देवाकडे त्याच्यासाठी प्रार्थना करते. यातून ती एक प्रकारे आपल्या कुटुंबासाठीच शुभकामना करत असते; कारण कोणत्याही कुटुंबाला पती-पत्नी दोघेही महत्त्वाचेच आहेत ना! आपल्या संस्कृतीत कुठलेही धार्मिक कर्तव्य हे पत्नीविना पूर्ण होत नाही. अनेक व्रते आहेत की, जे पुरुषही करतात. ही सारी व्रते कुटुंबाच्या लाभासाठीच असतात म्हणजे असे, आपल्याला कुठेही म्हणता येत नाही की, व्रतवैकल्ये ही केवळ स्त्रियांनाच सांगितलेली आहेत. स्त्री आणि पुरुष दोघेही कुटुंबासाठी व्रते करत असतात. कारण भारतीय संस्कृती हे दुसऱ्याचा विचार करण्याचा संदेश देते.

जर आपण वटसावित्री कथेचा आधार घेतला, तर सावित्री ही अश्वपती नावाच्या मोठ्या राजाची कन्या आहे. ती अतिशय हुशार, शस्त्र आणि शास्त्रात पारंगत आहे. तिने अतिशय विचारपूर्वक सत्यवानाशी विवाह केलेला आहे. ती प्रत्यक्ष यमाशी वाद घालते आणि जिंकते.

यातूनच तिची प्रखर बुद्धिमत्ता आपल्या लक्षात येते. कथेतून आपल्याला सावित्रीचे अनेक गुण दिसतात. तिचा स्वतःवर असलेला विश्वास दिसतो. कारण तिला लग्नाच्या आधीच ठाऊक होते की, सत्यवानाचे आयुष्य अधिक नाही; पण ती अतिशय विश्वासाने त्याच्याशी विवाह करून त्याला नुसते जीवनदानच देत नाही, तर त्याचे गेलेले राज्य परत मिळवते. यातून तिचा स्वतःवरचा विश्वास आणि स्वप्नपूर्तीचा ध्यास दिसतो. ती आपल्या अंध सासू-सासऱ्यांची सेवा करते. यातून तिचा विनम्रपणा देखील दिसतो. याखेरीज अतिशय कठीण परिस्थितीत ती आपल्या पतीला साथ देते. यातून तिचा समर्पित भावही कथा वाचल्यानंतर लक्षात येतो. थोडक्यात कथेचे सार असे आहे की, सावित्री एक अतिशय हुशार आणि कर्तृत्ववान राजकन्या आहे. ती कुणीतरी अशिक्षित किंवा अजाण अशी स्त्री नव्हे. तिने विचारपूर्वक निर्णय घेतला आणि त्यात ती यशस्वी झाली आहे. त्यामुळे हा सण स्त्रियांच्या गुलामीचा नव्हे, तर भारतीय स्त्री ही किती विचारी असते



आणि ती सर्व कर्तव्य निभावून कशी यशस्वी होते, हे दाखवणारा सण आहे. हा सण स्त्रियांच्या गौरवाचा सण आहे. या मृत्यूलोकामध्ये अशी एकमेव स्त्री झाली जिने आपल्या पतीचे प्राण यमाच्या पाशातून परत आणले, फक्त प्राणच नव्हे तर गतवैभवही मिळवले. तिच्या बुद्धिचातुर्याची ही कमालच म्हणावी. यमाने दिलेली प्रलोभने यांना झुगारून ती आपल्या मुद्द्यावर ठाम राहिली. आजच्या महिलांमध्ये हे गुण आहेत का? याचे उत्तर कौटुंबिक न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या घटस्फोट प्रकरणावरून समजते. आज घटस्फोटापर्यंत विषय जाण्याची गरज का पडत आहे याचा कोणी विचार केला का? सत्यवान आणि सावित्री यांच्या नात्याची आपण उदाहरणे देत असताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवायला हवी की, 'सत्यवान आणि सावित्री हे एकमेकांना पुरक होते. पूर्वीपासून आपल्याला सत्यवान सावित्रीची कहाणी ही ऐकायला मिळते, ही कहाणी ऐकताना कायम एकच विचार मनात येत होता की, त्या दोघांच्या नात्यांमधला सुसंवाद आणि एकमेकांना दिला जाणारा मान हा तेवढाच खरा होता, असा मान आणि सुसंवाद आताच्या घडीला साथीदाराकडून दिला जातो का?

आताची स्त्री ही सक्षम बनली आहे. तिला तिचे असे स्वतंत्र विचार देखील आहेत. ती तिच्या पायावर सक्षम उभी असल्यामुळे तिच्याकडे अडचणींवर मात करायचे साहस आहे. प्रत्येक स्त्रीला मान हा दिलाच गेला पाहिजे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या कुटुंबासाठी पुरुषासोबत खांद्याला खांदा लावून ती देखील तेवढीच मेहनत घेत असते. घरातले सांभाळून ती बाहेरच्या कामातही तिच्याकडून प्रामाणिक प्रयत्न करत असते तरी देखील स्त्रीला अजूनही दुय्यम स्थान दिले जाते. तसे बघायला गेले तर अजूनही आपल्या येथे पुरुषप्रधान संस्कृती बघायला मिळते. काही ठिकाणी अजून सुद्धा महिला आपल्या नवऱ्याच्या दबावाखाली राहत असल्याचे आपण बघतो. नवरा व्यसनी, दुराचारी असला तरीही स्त्री वटसावित्रीचा उपवास करते, याबद्दल माझे स्वतःचे असे मत आहे की, काही महिलांचे खरंच पतींवर प्रेम असते म्हणून व्रत करतात, तर काही महिला या फक्त लोकलाजेस्तव असे करतात.

जग खूप बदललं... छोट्या छोट्या कारणांवरून घटस्फोट होऊ लागलेत. एकमेकांना समजून घेण्याचा विचार आजच्या लग्न झालेल्या जोडप्यांमध्ये नाही. संसारातील तडजोड जिथे फक्त मी एकट्यानेच का करू? असा सवाल प्रत्येकजण एकमेकांना विचारू लागले.

ज्याप्रमाणे एका स्त्रीला पतीच्या आयुष्यासाठी हे व्रत करावे असे पूर्वीपासून दंतकथेमध्ये सांगितले आहे, त्याचप्रमाणे आताच्या घडीला पुरुषाने देखील आपल्या पत्नीसाठी हे व्रत करणे तितकेच गरजेचे आहे. कारण स्त्री देखील पुरुषाबरोबर तेवढ्याच ताकदीने आपल्या संसारासाठी झटत असते. त्यामुळे प्रत्येकाने याची सुरुवात आपल्या घरातून करावी, कारण जिथे एक स्त्री अशी आहे जिने आपल्यासमोर एक अनोखा आदर्श ठेवला आहे. ती स्त्री फक्त सावित्रीच असू शकते.

# व्हीईटी बाय ईएचएल स्वीस प्रोफेशनल डिप्लोमा

- 18 महिन्यांचा व्हीईटी बाय ईएचएल स्वीस प्रोफेशनल डिप्लोमा हा स्वित्झर्लंडमधील प्रख्यात ईएचएल हॉस्पिटॅलिटी बिझनेस स्कूलचा अभ्यासक्रम आहे.
- अभ्यासक्रमाची सुरूवात एआयएसएसएमएस पुणे येथे 6 महिन्याच्या प्रशिक्षणाने होते.त्यानंतर ॲडव्हान्स्ड सर्टिफिकेट प्रोग्राम व ऑन जॉब ट्रेनिंगसाठी विविध शहरातील आयएचसीएल हॉटेल्समध्ये 12 महिन्यांचे प्रशिक्षण
- 12 वी पास किंवा पदवीधर विद्यार्थी या अभ्यासक्रमात समाविष्ट होऊ शकतात.




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) ने हाती घेतलेल्या भारतीय हॉस्पिटॅलिटी (आदरातिथ्य) क्षेत्रातील कौशल्य विकासाच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत स्वित्झर्लंडच्या ईएचएल हॉस्पिटॅलिटी बिझनेस स्कुलच्या सहकार्याने 18 महिन्यांचा व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (व्हीईटी) प्रोफेशनल डिप्लोमा अभ्यासक्रम दिला जात आहे.हा अभ्यासक्रम गेली दोन वर्षे यशस्वीरित्या सुरू असून 100 हून अधिक विद्यार्थी पदवीधर होऊन उद्योगात सामील होण्यासाठी सज्ज झाले आहेत.

यावर्षी व्हीईटी बाय ईएचएल एआयएसएसएमएस पुणे केंद्रामध्ये 100 हून अधिक आणि चंदीगड आणि बंगळुरू सह एकंदर 400 विद्यार्थी या उपक्रमात समाविष्ट केले जाणार आहेत.या अभ्यासक्रमाचा कालावधी 18 महिने असून विद्यार्थ्यांना त्यांच्या स्पेशलायझेशन क्षेत्रात सिध्दांत आणि व्यावहारिकतेचा योग्य आधार दिला जातो. एआयएसएसएमएसमधील प्रशिक्षणानंतर ॲडव्हान्स्ड सर्टिफिकेट प्रोग्राम आणि निवडक आयएचसीएल हॉटेल्समध्ये प्रशिक्षण (ऑन द जॉब ट्रेनिंग) दिले जाते.

कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे सल्लागार प्रवीण रॉय म्हणाले की,भारतातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रात रोजगाराच्या संधींमध्ये 15 ते 20 टक्के वाढ अपेक्षित आहे. सीआयआयच्या इंडियन हॉटेल्स कंपनी लि.(आयएचसीएल) सोबत धोरणात्मक करार आणि ईएचएल हॉस्पिटॅलिटी बिझनेस स्कुलच्या शैक्षणिक भागीदारीसह ईएचएल प्रमाणित प्रशिक्षकांच्या मदतीने मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.हे प्रशिक्षक विभागप्रमुख देखील आहेत. हा अभ्यासक्रम खऱ्या अर्थाने उद्योगाकडून उद्योग आणि विद्यार्थ्यांसाठी आहे.

हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील नियोक्त्यांना उद्योगाच्या अपेक्षांप्रमाणे मनुष्यबळ मिळत नाही.जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त व्यावसायिक प्रशिक्षणाची आणि त्या माध्यमातून आदरातिथ्य क्षेत्रात प्रतिभावान व्यावसायिक निर्माण होऊ शकतील,याची भारतात निश्चित गरज आहे.व्हीईटी बाय ईएचएल अभ्यासक्रमाद्वारे ही कौशल्यातील दरी भरून काढण्यास मदत होत असून जागतिक आदरातिथ्य क्षेत्रात रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माता म्हणून भारताचे स्थान अधिक मजबूत होईल.केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील हॉटेल्स, एअरलाईन्स, क्रुझलाईन्स,केटरिंग व पर्यटन उद्योगासह आदरातिथ्य क्षेत्रात तरूणांना जागतिक प्रशिक्षण दिले जाईल.

## थोडक्यात



### 'भूमी नमस्कार'गाणे लॉन्च

**पुणे (आरंभ पर्व) :** हंगामा डिजिटल मीडिया आणि भामला फाऊंडेशन यांनी नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बहुप्रतिक्षित 'भूमी नमस्कार' गीताच्या सादरीकरणाची घोषणा केली. या कार्यक्रमाला भामला फाऊंडेशनचे अध्यक्ष आसिफ भामला, हंगामा डिजिटल मिडियाचे संस्थापक नीरज रॉय प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या अन्य प्रसिद्ध व्यक्तींमध्ये आर. बाल्की, शान, प्रसून जोशी, भूमी पेडणेकर, शंकर महादेवन, शेखर रवजियानी, श्यामक डावर आणि निती मोहन उपस्थित होते. 'भूमी नमस्कार' गीत पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरणाशी ताळमेळ साधणाऱ्या जीवनशैलीच्या महत्वाबाबत जागरूकता निर्माण करणारी एक उत्तम संकल्पना आहे. या प्रेरणामय गीतासाठी चित्रपट क्षेत्रातील अनेक प्रतिभावंत आणि सन्माननीय व्यक्ती एकत्र आल्या आणि या सर्वांनीच हे उत्तम कार्य पुढे नेण्यासाठी आपला आवाज आणि सर्जनशील ऊर्जा दिली. या गीताचे शब्द, निसर्गाशी ताळमेळ साधून राहण्याची शिकवण देणारे, पर्यावरण रक्षणाच्या गरजेवर भर देणारे आणि निसर्गाशी ताळमेळ साधून राहणाऱ्या जीवनशैलीमुळे होणारे फायदे सांगणारे आहेत. या गीताच्या संगीतात विविध शैलिंचा प्रभाव आहे आणि पर्यावरणाची देखभाल जगातील प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी असल्याचे हे गीत सांगते. प्रसिद्ध व्यक्तींना एकाच मंचावर आणून 'भूमी नमस्कार' हे गीत पृथ्वीची देखभाल करणे किती गरजेचे आहे इतकेच सांगत नाही तर लोकांना आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रेरणादेखील देते. हंगामा डिजिटल मिडियाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक नीरज रॉय यावेळी म्हणाले की, "जर आपल्याला पर्यावरण बदलाच्या प्रतिकूल प्रभावाला कमी करायचे असेल तर आपल्या परिसंस्थेला पुन्हा पहिल्यासारखे करावे लागेल, यावर 'भूमी नमस्कार' अभियान भर देते. या अभियानाचा उद्देश नैसर्गिक स्थितीच्या रक्षणासाठी वैयक्तिक आणि सामूहिक स्तरावर जागरुकता आणणे, हा आहे. भामला फाऊंडेशनबरोबरचे आमचे सहकार्य पर्यावरण संरक्षण आणि निसर्गाशी ताळमेळ साधणाऱ्या जीवनशैलीचा पुरस्कार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे."

## सीरमच्या मालकीच्या मर्सिडीजने तरुणाला चिरडलं

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यामधील पोर्षे कार अपघात प्रकरण चर्चेत असताना आणखी एक अपघाताची बातमी समोर आली आहे. सीरम कंपनीच्या मालकीच्या भरधाव मर्सिडीज कारने एका कुरिअर बॉयला चिरडलं. या अपघातामध्ये कुरिअर बॉयचा जागीच मृत्यू झाला असून कार चालकाला पोलिसांच्या हवाली केलं. पुण्यातील येरवडाच्या गोल्फ क्लब चौकात हा अपघात झाला. या अपघाताचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. केदार चव्हाण (41) असं अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या कुरिअर बॉयचं नाव आहे. येरवडा पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून ती कार नंजू उर्फ अर्जुन ढवळे हा चालवत होता. पुण्यातील गोल्फ कोर्स चौकामधून केदार चव्हाण जात होते. मात्र केदारची गाडी घसरल्याने ते रस्त्यावर पडले. दुपारची एक वाजताची वेळ होती. केदार पडला आणि त्यामागून एक मर्सिडीज बेंज येत होती ती सरळ त्याच्या अंगावरून गेली. केदार गंभीर जखमी झाला होता, त्याला रूग्णालयात नेण्यात आलं मात्र त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

## वडगाव बुद्रुक येथून बंद केलेल्या बसेस पुन्हा चालू करा

- माजी नगरसेवक हरिदास चरवड यांची आग्रही मागणी प्रसंगी ठिय्या आंदोलनाचा इशारा

**पुणे -लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

वडगाव बुद्रुक पासून गेले अनेक वर्षापासून बस क्रमांक 60 (धुलेनगर-मंडई) स्वारगेट – निवृत्तीनगर (सिंहगड कॉलेज) - स्वारगेट मधुकोश सोसायटी – प्रेयेजा सिटी – स्वारगेट अशा बस सुरू होत्या. गेल्या अनेक वर्षापासून या बस सेवा बंद आहेत.याबाबत नगरसेवक हरिदास चरवड यांनी



पी.एम.पी.एम.एल. स्वारगेट डेपो चे वाहतूक व्यवस्थापक यांच्याशी भेट घेऊन चर्चा केली , तातडीने बस सुरु करण्याची मागणी केली. अन्यथा ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

याबाबत दैनिक आरंभपर्वशी बोलताना जवळ जवळ 25,000 लोकवस्तीसाठी ह्या बस अत्यंत उपयुक्त होत्या. शेकडो विदयार्थी , नागरिक या बसने पुणे शहरात शिक्षण, नोकरी , कामधंद्यासाठी प्रवास करीत होते. धुलेनगर , हायवे , दभाडी, आंबेगाव बुद्रुक, प्रेयेजा , मधुकोश सोसायटी परिसरातील नागरिकांसाठी ही बससेवा मोठा आधार होती. मात्र अचानक ह्या बस बंद केल्याने येथील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

सदर ठिकाणी पुणे मनपाने लाखो रुपये खर्च करून बस स्थानकांची निर्मिती केली आहे. मोठ्या जल्लोषात तत्कालीन पालकमंत्री स्व.खासदार गिरीशजी बापट, आमदार भीमराव तापकीर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शंकर पवार आणि शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत या ठिकाणाहून बस सेवा आणि बस स्थानकांचे लोकार्पण झालेले आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांना याचा लाभ होत होता. कोरोना काळात या बस बंद करण्यात आल्या व पुन्हा सुरूच झाल्या नाही. याबाबत पी.एम.पी.एम.एल. प्रशासनास निवेदन दिऊन सर्व बस पूर्ववत सुरु करण्यात यावा अन्यथा ह्यां कार्यालयात येऊन ठिय्या आंदोलन करणारं असल्याचे त्यानी सांगितले.

# युग्रो कॅपिटलने साध्य केली भागभांडवल वाढ

- एनसीडी आणि वॉरंटद्वारे 1,265 कोटी रुपयांच्या भांडवल वचनबद्धतेतून गुंतवणूकदारांचा कंपनीवरील ठाम आत्मविश्वास प्रकट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमएसएमई उद्योगक्षेत्राला कर्ज देण्यावर आपले लक्ष केंद्रित करणारी आणि आघाडीची डेटाटेक एनबीएफसी असलेल्या युग्रो कॅपिटल लिमिटेडने (NSE: UGROCAP | BSE: 511742) 1,265 कोटी रुपयांची भागभांडवल वाढ, अनिवार्य परिवर्तनीय डिबेंचर (सीसीडी) तसेच वॉरंटचे वाटप यशस्वीरित्या पूर्ण केल्याची घोषणा केली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने 2 मे 2024 रोजीच्या बैठकीत 1,332.66 कोटी रुपयांच्या भाग भांडवल वाढीस मान्यता दिली होती. भारतात लोकसभेची सार्वत्रिक निवडणुक शिखरावर असताना संचालक मंडळाची बैठक झाली होती.

युग्रो कॅपिटलला 1 जून 2024 रोजी समभागधारकांची मंजुरी मिळाली. नेमका हा कालावधी निवडणुकीच्या निकालांबद्दलची अनिश्चितता आणि त्यामुळे शेअरबाजारात तीव्र चढउतारांनी भरलेला होता. अशी स्थिती असतानाही युग्रोमधील गुंतवणूकदारांची कंपनीशी बांधिलकी मजबूत राहिली. नियामक कारणास्तव अपात्र ठरलेल्या एका गुंतवणूकदाराचा अपवाद वगळता इतर सर्व गुंतवणूकदारांनी युग्रोमध्ये पूर्ण गुंतवणूक केली आहे. कंपनीने 258 कोटी रुपयांचे सीसीडी आणि 1,007 कोटी रुपयांच्या वॉरंटचे यशस्वीरित्या वाटप केले आहे, विद्यमान खासगी इक्विटी गुंतवणूकदार असलेल्या समेना कॅपिटलने आपला भक्कम पाठिंबा देताना वॉरंटच्या माध्यमातून 500 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. एरेजेन्ससारख्या संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून त्याचबरोबर भारतातील अनेक प्रतिष्ठित फॅमिली ऑफिसेस सारख्या गुंतवणूकदारांनीसुध्दा कंपनीतील गुंतवणूकीबाबत आपली वचनबद्धता दाखविली. युग्रोचे संस्थापक, संचालक मंडळाचे सदस्य आणि व्यवस्थापन संघाने देखील वॉरंटआधारे गुंतवणूक केली आहे.

युग्रोने जारी केलेले वॉरंट वाटपाच्या तारखेपासून 18 महिन्यांच्या आत वापरता येऊ शकतात. गुंतवणूकदारांना आता इश्यू किंमतीच्या 25 टक्के आणि उर्वरित रक्कम 18 महिन्यांनंतर देय आहे. आता उभारलेला निधी हा युग्रोची तिसरी भांडवल वाढ ठरली आहे.

युग्रो कॅपिटलचे संस्थापक आणि व्यस्थापकीय संचालक श्री. शचिंद्र नाथ म्हणाले, शेअरबाजारात तीव्र चढउतार असतानाही आम्ही साध्य केलेली ही भांडवलवाढ आमच्या गुंतवणूकदारांचा आमच्यावर असलेला विश्वास प्रकट करते. आमचा उद्देश नेहमीच एक DataTech आधारित कर्ज देणारी संस्था उभी करणे हे आहे आणि ती संस्थात्मक मालकी असलेली, स्वतंत्रपणे पर्यवेक्षण केलेली आणि व्यावसायिकरित्या व्यवस्थापित केलेली तसेच सार्वजनिक बाजारातील गुंतवणूकदारांसाठी प्रवेशयोग्य असेच तिचे स्वरुप हवे आहे. आम्ही आता भारतातील सर्व लहान व्यवसायांना मदत करण्याच्या आमच्या उद्दिष्टाच्या अगदी जवळ पोहचलो आहोत आणि ते घडवून आणल्याबद्दल आमच्या सर्व गुंतवणूकदार, भागीदार आणि संपूर्ण युग्रो टीमबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे."

2018 मध्ये श्री शचिंद्र नाथ यांनी 40 कोटींचे मालमत्ता मूल्य असलेली तसेच नोंदणीकृत असलेली 'चोखानी सिक्युरिटीज लिमिटेड' ही एनबीएफसी संपादन करून भारतातील पहिल्या लिस्टेड स्टार्ट-अपची संकल्पना मांडली आणि त्याची यशस्वीरित्या अंमलबजावणीही केली. टीपीजी-न्यूक्वेस्ट, पीएजी, एडीव्ही कॅपिटल, समेना कॅपिटल आणि इतर प्रतिष्ठित कौटुंबिक कार्यालये आणि सार्वजनिक बाजारातील गुंतवणूकदारांकडून 914 कोटी रुपयांचे संस्थात्मक भागभांडवलही उभारले. कंपनीचे व्यूहात्मक विस्तारीकरण करताना युग्रो कॅपिटलने गेल्या वर्षी 340.50 कोटी रुपयांचे भांडवल उभारले आहे. त्यात डेन्मार्क सरकारची मालकी असलेल्या आयएफयू संस्थेकडून डॅनिश शाश्वतता विकास उद्दीष्ट फंड के/एसच्या आधारे 240 कोटी रुपये आणि पात्र संस्था प्लेसमेंटद्वारे (QIP) अन्य संस्थात्मक भागधारकांच्या 100.5 कोटी रुपये भांडवलाचा समावेश आहे.

युग्रो कॅपिटलने, स्थापनेपासून तब्बल 2,700 कोटी रुपयांचे भाग भांडवलाची उभारणी केलेली आहे. कंपनीकडे देशांतर्गत आणि जागतिक संस्थांचा 4,643 कोटी रुपयांचा एकूण थकीत कर्ज आहे. तसेच 13 बँका आणि इतर वित्तीय संस्थांसोबत भागीदारी करत कंपनीने 3,295 कोटी रुपयांचे एकत्रितरित्या कर्जवाटप केलेले आहे. यामुळे भारतातील 78,000 पेक्षा जास्त एमएसएमई उद्योगक्षेत्रापर्यंत डेटा-आधारित सानुकूलित वित्त उपायांचा विस्तार करण्यात कंपनीला यश आले आहे.

# थोडक्यात



## संकल्प युवा प्रतिष्ठाणकडून धामणे शाळेतील विद्यार्थ्यांना छत्री वाटप

**खेड (आरंभ पर्व) :** धामणे (ता.खेड) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संकल्प युवा प्रतिष्ठाण खारदांडा (मुंबई) यांच्याकडून मोफत छत्री वाटप करण्यात आले. प्रतिष्ठाणचे अध्यक्ष माणिक भवार यांच्या संकल्पणेतून ग्रामीण विद्यार्थ्यांना शाळेत येताना पावसापासून संरक्षण मिळावे या हेतूने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष माणिक भवार, वहागावच्या प्रथम लोकनियुक्त सरपंच सोनल नवले,वहागाव शाखा अध्यक्ष सुनिल नवले, कैलास नवले, धिरज सिकदर, विशाल जाधव, सूरज शेळके, राहुल नवले, बाबाजी सातपुते आदि मान्यवर व ग्रामस्थ, पालक उपस्थित होते. प्रतिष्ठाणने मागील वर्षी धामणे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत दर्जेदार दप्तर वाटप केले होते. गरजू शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहीत्य वाटप करण्याचा उपक्रम गेली अनेक वर्षांपासून प्रतिष्ठाण राबवत आले आहे. संकल्प प्रतिष्ठाणच्या उपक्रमांचे पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे तसेच खेड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे संयोजन गोरख नवले, अमर केदारी, मंगल निमसे या शिक्षकांनी यशस्वीपणे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक धर्मराज पवळे यांनी केले. सूत्रसंचालन गोरख नवले यांनी केले तर अमर केदारी यांनी आभार मानले.



## तोरणे बु शाळेत नवगतांचे स्वागत उत्साहात

**खेड (आरंभ पर्व) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोरणे बुद्रुक ता. खेड येथे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे व इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व शिक्षकांकडून लेखन साहित्य वाटप करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या दाखल होणाऱ्या नवगतांचे फेटा बांधून व गुलाब पुष्प देऊन औक्षण करून वाजत गाजत स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच आरती शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल राऊत, माजी उपसरपंच बाळासाहेब देवाडे, उपाध्यक्ष कृष्णा आवारी आदी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन केंद्रप्रमुख संजय गोपाळे, मुख्याध्यापक बाबाजी गायकवाड, शिक्षक सचिन गावडे, माया वरकड, कल्पना वाबळे,काजल देवाडे, लक्ष्मी कंगले यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



## परदेशी शिष्यवृत्ती संदर्भातील जाचक अटी रद्द करा : आबनावे

**पुणे (आरंभ पर्व) :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीमध्ये समान धोरणाच्या नावाखाली जाचक अटी घातल्या आहेत. या अटींमुळे सर्वसामान्य, बहुजन व मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे या जाचक व असंवैधानिक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रथमेश आबनावे यांनी केली. या अटी रद्द करून प्रचलित पद्धती लागू न केल्यास युवक काँग्रेसतर्फे या असंवैधानिक जीआरची होळी केली जाईल. तसेच राज्यव्यापी आंदोलन व जीआरविरुद्ध न्यायालयीन लढा उभारण्यात येईल, असा इशाराही आबनावे यांनी दिला.

# विज्ञान भारतीचे सहावे राष्ट्रीय अधिवेशन पुण्यात

## विज्ञान भारतीचे अध्यक्ष डॉ. शेखर मांडे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतीय विज्ञानाबद्दल जनजागृती घडवून आणणाऱ्या विज्ञान भारतीचे सहावे राष्ट्रीय अधिवेशन येत्या शनिवार व रविवारी (दि. 22 व 23 जून 2024) पुण्यात लोणी काळभोर येथील एमआयटी-एडीटी कॅम्पसमध्ये होणार आहे, अशी माहिती विज्ञान भारतीचे अध्यक्ष व सीएसआयआरचे माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी विज्ञान भारतीचे महासचिव प्रा. सुरेश भदोरिया, राष्ट्रीय सचिव डॉ. अरविंद रानडे उपस्थित होते.

डॉ. शेखर मांडे म्हणाले,



"या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवारी (दि. 22) सकाळी 11.30 वाजता होणार आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जीतेंद्र सिंह, प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, इस्रोचे अध्यक्ष एस सोमनाथ, प्रख्यात विचारवंत सुरेशजी सोनी, सामाजिक कार्यकर्ते सुनील आंबेकर आदी मान्यवर अधिवेशनातील विविध सत्रांत सहभागी होणार आहेत. तसेच प्रख्यात शास्त्रज्ञ व विज्ञान भारतीचे मार्गदर्शक डॉ, विजय भटकर, सीएसआयआरचे माजी महासंचालक आणि विज्ञान भारतीचे अध्यक्ष डॉ. शेखर मांडे, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड आणि विज्ञान तंत्रज्ञान सचीव डॉ. अभय करंदीकर आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत."

डॉ. अरविंद रानडे म्हणाले, "देशभरातील विज्ञान भारतीचे जवळपास 1500 पदाधिकारी या अधिवेशनास पूर्णवेळ उपस्थित राहणार आहेत.

यासह पुण्यातील 200 हुन अधिक सदस्य, विद्यार्थी व विज्ञानप्रेमी नागरिकांची उपस्थिती असणार आहे.

हरित ऊर्जा, हायड्रोजन इंधन, इलेक्ट्रीक वाहने आणि ऊर्जा सुरक्षा; नव्या शैक्षणिक धोरणातील विज्ञान, तंत्रज्ञान व इनोव्हेशन या विषयांच्या शिक्षणविषयक तरतुदी, तसेच हवामान बदल आणि पर्यावरण व पाणी यांकरिता जीवनशैली या विषयांवरील चर्चासत्रांमध्ये सहभागी होतील, त्याशिवाय समग्र विकासासंदर्भातील भारतीय चिंतन, विज्ञान व अध्यात्म आदी विषयांवरील व्याख्यानेही अधिवेशनात होणार आहेत. रविवारी संध्याकाळी चार वाजता अधिवेशनाच्या समारोप सत्राला सुरुवात होईल."

> प्रा. सुरेश भदोरिया म्हणाले, "विज्ञान भारतीचे राष्ट्रीय अधिवेशन हे एक महत्त्वाचे संमेलन आहे. गेल्या ३३ वर्षांमध्ये, विज्ञान भारतीने आपल्या मुख्य उद्दिष्टांसाठी कटिबद्ध, एकत्रित प्रयत्नांचे प्रदर्शन केले असून, त्याचा आढावा घेणारी एक स्मरणिका प्रकाशित होणार आहे. यामध्ये विज्ञान भारतीचा स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास सूक्ष्मपणे मांडलेला आहे. तसेच, वैज्ञानिक दृष्टिकोनातून २०४७ च्या भारताची कल्पना करणाऱ्या शास्त्रज्ञांनी लिहिलेल्या लेखांद्वारे विचार जागृत केले जातील."

## स्टार हेल्थ इन्शुरन्सने फेस स्कॅन टूल केले लॉन्च

**पुणे (दै. आरंभ पर्व)** स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या भारतातील सर्वात मोठ्या रिटेल हेल्थ इन्शुरन्स कंपनीने दूरस्थ आरोग्य मूल्यांकनासाठी तयार करण्यात आलेले एआय प्रेरित स्टार हेल्थ फेस स्कॅन हे एक नावीन्यपूर्ण आर्टिफिशयल इंटेलिजन्स साधन लॉन्च करून आरोग्य देखरेखीत जणू क्रांतीची सुरुवात केली आहे. हे फेस स्कॅन साधन एक मिनिटापेक्षाही कमी वेळात एक व्यापक आरोग्य तपासणी करते आणि व्यक्तीची सुविधा अबाधित ठेवून आरोग्याच्या 18 मुख्य निकषांबद्दल मौल्यवान रियल-टाइम अंतर्दृष्टी प्रदान करते. या फेस स्कॅन फीचरच्या मदतीने लोक रक्त दाब, नाडीचा दर, हृदयाचा दर, हिमोग्लोबिन आणि तणावाची पातळी वगैरे मुख्य निकषांचा सहज मागोवा घेऊ शकतात. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आर्टिफिशयल इंटेलिजन्सच्या मदतीने हे साधन चेहऱ्याचे विश्लेषण करून तात्काळ आरोग्य मूल्यांकन प्रदान करते. आरोग्य विषयक समस्येचे अगदी सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास वैद्यकीय उपचार देखील वेळेवर मिळू शकतात. इन्शुरन्स कव्हरेज बरोबर आरोग्य देखरेख ठेवून, हे साधन इन्शुरन्स सेवांचे मूल्यवर्धन करते. या प्रगतीमधून भारतीयांसाठी आरोग्याची देखरेख सहज प्राप्य आणि सोयिस्कर बनविण्याची स्टार हेल्थची वचनबद्धता दिसून येते. आगामी प्रगतीत रक्त शर्करा आणि कॉलेस्टेरॉल मापण्याची क्षमता सामील आहे.

## नखशिखांत लावणी हीच महाराष्ट्राची खरी शान : रेश्मा परितेकर

### भीमथडी मराठी साहित्य संमेलनात लावणी सम्राज्ञी रेश्मा परितेकर यांनी व्यक्त केली भावना

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)** लावणीकला बावनकशी सोने आहे. अलीकडे लावणीला मॉडर्न करण्याचे काम सुरु आहे. अंग प्रदर्शन करून शृंगार रस सादर केला जात आहे. मात्र नखशिखांत लावणी कला हीच महाराष्ट्राची खरी शान आहे, असे मत लावणी सम्राज्ञी रेश्मा परितेकर यांनी व्यक्त केले. निमित्त होते, भीमथडी मराठी साहित्य संमेलनात लावणी कलेचे बदलते स्वरुप या विषयावर प्रकट मुलाखतीचे. त्यावेळी परितेकर बोलत होत्या, यावेळी ज्येष्ठ लावणी कलावंत व चोफुला येथील रेणुका कला केंद्राच्या संचालिका सुषमा नेर्लेकर व रेखा काळे सहभागी झाल्या होत्या. ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी खुमासदार प्रश्न विचारून लावणी कलावंतांना बोलते केले. पेशवाईतील शाहीर सगनभाऊ, होनाजी बाळा यांनी




दरबारी लावणी चे फड चालवले. पुढे तमाशा, कलाकेंद्रतून लावणीला लोकाश्रय मिळू लागला. श्रृंगारिक लावणी रसिकांना मोहिनी घालून मनोरंजन करत असताना मराठी माणूस हरवून जायचा. यात्रा, जत्रामध्ये लावणीला रसिकांनी डोक्यावर घेतले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी वीर रसाच्या लावण्या करून गाजवली, असा संदर्भ देत यादव यांनी रसिकांचे मनात कुतुहल निर्माण करून प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम उंचीवर नेला. मी लहान असताना आईच्या बरोबर पायात चाळ बांधून नाचायला शिकले. पोटाची भूक भागवण्यासाठी परंपरागत लावणीकडे वळले. कष्ट आणि मेहनतीने लावणीचा वारसा जतन करताना मानसन्मान मिळाले. पण नखशिखांत लावणीचे सध्या होणारे वस्त्रहरण पाहवत नाही अशी भावना रेश्मा परितेकर यांनी बोलून दाखवली. दिलखेचक अदा आणि ठसकेबाज लावणी सादर करून रसिकांना वेड लावणा-या परितेकर सध्या पुणे विद्यापीठात लावणी कलेवर पीएचडी करीत आहेत. अकलूजला लावणी महोत्सवात चार वेळा प्रथम क्रमांक मिळवला आहे.

राज्यस्तरीय तिसरे भीमथडी मराठी साहित्य संमेलनात प्रकट मुलाखतीत लावणीचे बदलते स्वरुप यावर परितेकर म्हणाल्या, "महाराष्ट्राची सांस्कृतिक कला ही लावणी शिवाय पुर्ण होऊ शकत नाही. परंतु, अलिकडे लावणी मॉडर्न करण्याचा प्रयत्न होत आहे, हे योग्य नाही. अगं प्रदर्शन ही लावणीची संस्कृती नाही. पैशासाठी लावणीचे वस्त्रहरण करणे योग्य नाही, नखशिखांत झाकलेली लावणीचे रसिकांना आकर्षण आहे." काशीचा ब्राह्मण या अदाकारीच्या लावणीची झलक दाखवून त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

## साताऱ्यात डेंग्यूचे आठ रुग्ण, सतर्कता बाळगण्याचे आवाहन

- हिवताप विभागाकडून सर्वेक्षण

**सातारा (दै. आरंभ पर्व)** सातारा शहरात डेंग्यू बाधितांच्या संख्येत हळूहळू वाढ होऊ लागली असून सध्या आठ बाधितांवर शहरातील विविध खाजगी रुग्णालयांत उपचार सुरु आहेत. साथरोगांच्या पार्श्वभूमीवर हिवताप विभागाने विशेष खबरदारी म्हणून शहरात गृहभेटीद्वारे डेंग्यू अळ्यांचा शोध घेऊन त्या नष्ट करण्याची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी पावसाळा सुरु झाला की जिल्ह्यात डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया असे आजार डोके वर काढतात. यंदादेखील मान्सूनला सुरुवात होताच कोरेगाव व सातारा तालुक्यात डेंग्यूचे रुग्ण आढळून आल्याने जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. सध्या सातारा शहरात डेंग्यूबाधित रुग्णांची



संख्या आठवर पोहोचली असून, या रुग्णांवर खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. हिवताप विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून सातारा शहरात गृहभेटीद्वारे सर्वेक्षण सुरु केले आहे. या कामी आशासेविका व आरोग्यसेविकांच्या तीन पथकांनी नेमणूक करण्यात आली असून, या पथकांद्वारे दररोज 300 घरांना भेटी देऊन नागरिकांच्या आरोग्याच्या नोंदी घेणे, घरातील पाण्याच्या कंटेनरची तपासणी करून डेंग्यू अळ्यांचा शोध घेणे, डेंग्यू अळ्या आढळून आल्यास कंटेनर मोकळे करून अळ्या नष्ट करणे, अॅबेटिंग करणे अशी कामे गतीने केली जात आहे. या पथकांनी शहरातील सदर बझार, लक्ष्मीटेकडी, मतकर झोपडपट्टीकडे विशेष लक्ष दिले असून, येथे तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविली जात आहे. आरोग्य विभागाकडून जिल्ह्यातील 84 प्राथमिक आरोग्य केंद्रात डेंग्यू तपासणीची मोफत व्यवस्था उपलब्ध केली आहे. त्यामुळे ज्या नागरिकांना सांधेदुखी, ताप, कणकणी, अशक्तपणा असा त्रास जाणवत आहे, त्यांनी आजार अंगावर न काढता तातडीने डेंग्यूची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा हिवताप विभागाकडून करण्यात आले आहे.

## सरश्री यांचे अनमोल विचार ऐकण्याची पुणेकरांना सुवर्णसंधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)** प्रख्यात वक्ते सरश्री यांचे विचार ऐकण्याची पुणेकरांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून येत्या 30 तारखेला सकाळी 10 ते सायंकाळी 1 वाजेपर्यंत



मनन आश्रम, सिंहगड रोड, पुणे येथे सरश्री यांचे अनमोल विचार ऐकण्याची तसेच निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या पुण्यातील मनन आश्रमाच्या सुंदर आणि पवित्र भूमीवर हा कार्यक्रम आयोजित केला गेला आहे, जिथे आजवर लाखो लोकांना जीवनाची नवी दिशा सापडली आहे. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक सरश्री यांचे विचार ऐकण्याची संधीही उपलब्ध झाली आहे. रोजच्या धावपळीच्या आयुष्यातल्या अडचणी, त्यामुळे येणारे नकारात्मक विचार, यामुळे तुम्ही सतत मानसिक त्रास या सगळ्यामुळे आपल्याला शांत आणि संतुष्ट जीवन कधीच जगता येणार नाही, असं तुम्हाला वाटत असेल तर संपूर्ण मनःशांती प्राप्त करण्याचा सोपा, सरळ मार्ग म्हणजे आत्मज्ञानाची गुरुकिल्ली हा आहे. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक सरश्री यांचे विचार ऐकण्याची विनामूल्य संधीही उपलब्ध झाली असून जास्तीत जास्त पुणेकरांनी या शिबिरात सहभाग घ्यावा असे आवाहन तेजज्ञान फाउंडेशन यांच्याकडून करण्यात आले आहे.

## उत्साही व धार्मिक वातावरणात बकरी ईद साजरी

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)** खेड तालुक्यात ईद उल अजहा ( बकरीईद ) मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक एकता ,समृद्धी व शांततेसाठी मुस्लिम बांधवांनी यावेळी प्रार्थना केली. खेड पोलिस स्टेशनच्या वतीने ईद निमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.



खेड तालुक्यातील राजगुरुनगर, चाकण, आळंदी तसेच दावडी, पाईट, वाडा, कडूस, शेलपिंपळगाव, वाफगाव या ग्रामीण भागात मुस्लिम समाज बांधवांनी एकत्र येऊन सामूहिक नमाज अदा केली. यावेळी परिसरातील हिंदू व मुस्लिम बांधवांनी आलिंगन देऊन एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. वाफगाव (ता. खेड ) येथे जामा मस्जिद मध्ये मौलाना अबूखफा यांनी नमाज व कुराण पठण केले. तसेच सामूहिक प्रार्थना करून बकरी ईदचे महत्व विशद केले. या वेळी खेड पोलिस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संदीप कारभळ यांनी येथील जामा मस्जिदीत मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी समाजाचे रज्जाक इनामदार यांच्या सह आयनुल तांबोळी, मुराद ईनामदार अब्दुल मुलाणी, शमा तांबोळी , शमशुद्दीन इनामदार, अब्बास कुरणे, समीर इनामदार, उस्मान मणियार, महम्मद हुसेन कुरणे, मेहमूद मुलाणी, रज्जाक कुरणे, शफी सय्यद यांच्यासह मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. पाऊसामुळे ईदगाह मैदाना ऐवजी येथील जामा मस्जिद मध्ये वाफगाव येथील मस्लिम बांधवांनी नमाज पठण करून बकरी ईद साजरी केली.


## राजगुरुनगर नगर परिषद, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे
ई-निविदा सुचना क्रमांक- 2025
सन - 2024-25

जावक क्र.-246
दिनांक - 20/6/2024

राजगरुनगर नगरपरिषद, राजगुरुनगर ता. खेड, जि. पुणे यांचेकडुन राजगुरुनगर नगरपरिषदेच्या विविध कामांसाठी बी-1 नमुन्यातील निविदा, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार, जे पूर्व अर्हता अटी पूर्ण करतील अशा ठेकेदारांकडून खालील कामासाठी साठी निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधिचा सविस्तर तपशिल शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म किंमत रु. | अनामत रक्कम रु. | काम करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | राजगुरुनगर नगरपरिषद, राजगुरुनगर येथे स्थापत्य विषयक (अत्यावश्यक) किरकोळ कामे PWD च्या चालु आर्थिक वर्षाच्या DSR दराच्या प्रमाणात (कमी/अधीक) दर नोंद करून स्थापत्य विषयक किरकोळ कामे करणे बाबत. | 1,000/- | 50,000/- | 1 वर्ष |

दिनांक :- 21/06/2024

सही/-
(श्रीकांत लाळगे)
मुख्याधिकारी,
राजगरुनगर नगरपरिषद, राजगुरुनगर
ता. खेड, जि. पुणे



## जाहीर नोटीस

पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सिनीयर
डिव्हीजन सो. यांचे कोर्टात
मे. एस.आर. तोतला कोर्ट

किरकोळ अर्ज नं. - 915/2024
नि. 06

आनंद सदानंद काळे--------अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही--------जाबदेणार

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट 1827चे कलम 2 व 3 अन्वये या कोर्टाकडे मयत कै. शरद शंकर काळे यांचा मृत्यू दिनांक 12/04/1990 रोजी ससून हॉस्पिटल पुणे येथे झाला आहे.

कै. शरद शंकर काळे यांच्या मौजे. मौजे तारळे धनगरवाडी ता. पाटण जि. सातारा येथील गट क्र. 24 क्षेत्र 0.80.00 क्षेत्र हे आर आकार रू.पै. 2.50 च्या मिळकतीचा बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट 1827चे कलम 2 व 3 प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरीता अर्जदारांनी अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्याने पुढील नेमलेली तारीख 24/07/2024 रोजी ठीक सकाळी 11.00 वाजता स्वत: किंवा वकिलामार्फत या मे. कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक 18/06/2024 रोजी सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकुमान्वये
सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, पुणे

## थोडक्यात



### मुक्तांगण इंग्लिश स्कुलच्या कॅडेट्सचे यश

**पुणे (आरंभ पर्व) :** राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) कम्बाईन्ड ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्पमध्ये पुणे विद्यार्थी गृहाच्या मुक्तांगण इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या एनसीसी एअर विंग कॅडेट्सनी घवघवीत यश संपादन केले. सेनापती बापट रस्त्यावरील एनसीसीच्या मुख्यालयात आयोजित दहा दिवसांच्या निवासी शिबिरात नववीतील 21 कॅडेट्स सहभागी झाले होते. शिबिरात झालेल्या विविध स्पर्धांत कॅडेट्सनी सहभाग घेत यश मिळवून शाळेचे नाव अभिमानाने उंचावले. सांघिक गटांतून प्रश्नमंजुषा स्पर्धेत विजेतेपद, ड्रिल स्पर्धेत उपविजेतेपद, सांस्कृतिक स्पर्धांत उपविजेतेपद पटकविले. राजवीर जाधवराव याला 'बेस्ट कॅडेट जेडी', तर वेदांती कदम हिला 'बेस्ट कॅडेट जेडब्ल्यू'चा मान मिळाला. यासह एनसीसी एअरविंग ग्रुप कोईमतूर यांच्या वतीने आयोजित ऑल इंडिया एनसीसी गर्ल्स ट्रेकिंग एक्स्पेडिशन 2024 मध्ये कॅडेट इरा जोशी, कॅडेट आर्या चोरमुले, कॅडेट शर्वरी जगताप यांनी सहभाग घेतला. कॅडेट्ससाठी हा एक रोमांचकारी अनुभव होता. एअरविंगच्या संपूर्ण तुकडीला ऑफिसर श्रुती कांबळे यांनी प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. संस्थेचे सर्व संचालक व व्यवस्थापन, शाळेचे संचालक आनंद कुलकर्णी, मुख्याध्यापिका मिना राणे, पर्यवेक्षिका सायली धाकरस, सुप्रिया देशकुलकर्णी व जयती नरवणे यांनी सर्व कॅडेट्स व ऑफिसर यांचे अभिनंदन केले.

### फोनपे पेमेंट गेटवेतर्फे रेफरल प्रोग्राम लाँच

**पुणे (आरंभ पर्व) :** फोनपे पेमेंट गेटवेने आज त्यांचा रेफरल प्रोग्राम लाँच करण्याची घोषणा केली आहे. फोनपे पीजी भागीदार प्रोग्रॅम हा ऑनलाइन व्यवसायाच्या विकासात मदत करणाऱ्या प्रत्येकासाठी डिझाइन करण्यात आला आहे. रेफरल पार्टनर म्हणून, ते त्यांच्या ग्राहकांना त्यांच्या ग्राहकांकडून ऑनलाइन पेमेंट स्वीकारण्यासाठी आणि व्यवसायाच्या विकासाला गती देण्यासाठी रेफर करू शकतात. या प्रोग्रॅममुळे व्यवसायांना उद्योगक्षेत्रातील सर्वात स्पर्धात्मक कमिशन दरांपैकी एक दर ऑफर केला जातो, हा दर त्यांच्या रेफरल कमाईमध्ये भरघोस वाढ करण्यात मदत करणाऱ्या प्रत्येक व्यवहारासाठी लागू होतो. व्यवसाय त्यांच्या व्यापाऱ्यांना सर्वोत्कृष्ट पेमेंट सोल्यूशन्स ऑफर करण्यासाठी फोनपे पीजी भागीदार प्रोग्रॅममध्ये सहभागी होऊ शकतात. या भागीदारीमुळे विश्वासार्हता वाढते आणि व्यवसायांना ग्राहकांसाठी त्यांच्या आवडीचे विक्रेता बनण्यास मदत करते, विश्वास वाढवते आणि व्यवसायाच्या विस्तारास चालना देते. इआरपी, सीआरएम आणि स्यास कंपन्यांसारख्या तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मसाठी विकासक आणि डिजिटल एजन्सीसह विविध व्यवसायांसाठी हा प्रोग्रॅम खुला आहे. भागीदारांना नियोजित मासिक पेआउट, फोनपे पीजी द्वारे होस्ट केलेल्या प्रोग्रॅम्ससाठी विशेष आमंत्रणे आणि कोणत्याही समस्यांमध्ये मदत करण्यासाठी खास खाते व्यवस्थापक यांचा फायदा होतो. तंत्रज्ञान भागीदारांना त्यांच्या उत्पादनांसह अखंड एकीकरणासाठी तांत्रिक सहाय्यासह अतिरिक्त सपोर्ट मिळेल. फोनपे पेमेंट गेटवे आणि ऑननाइल मर्चंट्सचे प्रमुख अंकित गौर म्हणाले, की "फोनपे पीजी भागीदार प्रोग्रॅम सुरू करून, आम्ही अत्याधुनिक पेमेंट सोल्यूशन्स आणि लाभदायक भागीदारीद्वारे व्यवसायांना सक्षम बनवण्यातील आमचे समर्पण अधोरेखित करत आहोत. लॉन्च झाल्यापासून आम्ही आमच्या रेफरल प्रोग्रामचा अवलंब करण्यात 10 पटींपेक्षा जास्त वाढ पाहिली आहे. या उपक्रमाद्वारे, आम्ही व्यापाऱ्यांना त्यांच्या ऑनलाइन व्यवसायाचे यश वाढवण्यासाठी अत्याधुनिक फिनटेक सोल्यूशन्स आणि ऑफरचा वापर करण्यास सक्षम बनवण्याचा प्रयत्न करतो." अहमदाबादमधील कॉन्फ्लुएन्स नावाच्या एका भव्य प्रोग्रॅमात पीजी रेफरल प्रोग्रॅम सुरू करण्यात आला. या प्रोग्रॅमात फोनपे पेमेंट गेटवेचे प्रमुख अंकित गौर यांच्या नेतृत्वाखाली सत्रे झाली, त्यानंतर नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. या प्रोग्रॅममध्ये ज्ञानाचे आदानप्रदान देण्यात आले. संभाव्य रेफरल भागीदारांनी चर्चेत सक्रियपणे भाग घेतला, त्यांच्या ऑनलाइन वाढीला गती देताना व्यवसायांना भेडसावणाऱ्या सामान्य आव्हानांसाठी उपाय शेअर केले.



सिंहगड रोडवरील वडगाव ब्रिजवर दुभाजकावर फुलझाडे मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे निर्दशनास येत आहे. या दुभाजकावरील झाडांची छाटणी करण्यात यावी अशी मागणी होत आहे. फोटो : लक्ष्मण साबळे

# दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम परिषदेला पुण्यात प्रारंभ

## फिडे व इंडियन ऑईलच्या मान्यवरांची येरवडा कारागृहाच्या सुवर्णपदक विजेत्या संघाला भेट

**पुणे – लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना(फिडे) यांच्या वतीने आयोजित आणि इंडियन ऑईल पुरस्कृत दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम परिषदेला पुण्यात उत्साहात प्रारंभ झाला. या परिषदेचे औचित्य साधून फिडे व इंडियन ऑईलच्या पदाधिकाऱ्यानी येरवडा मध्यवर्ती कारागृहाला भेट दिली. यावेळी त्यांनी फिडे आयोजित तिसऱ्या आंतर खंडीय बंदीवानांच्या ऑनलाईन बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक पटकवणाऱ्या येरवडा कारागृहाच्या संघातील खेळाडूंची भेट घेतली. या संघातील खेळाडूंना इंडियन ऑईल पुरस्कृत "परिवर्तन प्रिझन टू प्राईड" या उपक्रमा अंतर्गत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. या पदाधिकाऱ्यामध्ये इंडियन ऑईलच्या मनुष्य बळ विभागाच्या संचालिका रश्मी गोवील, फिडेच्या सामाजिक परिषदेचे सल्लागार मिखाइल कोरेनमन, फिडेच्या सामाजिक परिषदेचे आयुक्त आंद्रे वोगटिन, केंद्रीय कारागृह व सुधारगृह सेवा विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर (आयपीएस), एआयसीएफचे सचिव देव पटेल, एमसीएचे कार्यकारी अध्यक्ष सिध्दार्थ मयुर, एमसीएचे मानद सचिव निरंजन गोडबोले, ग्रँड मास्टर अभिजीत कुंटे, तसेच, कारागृह विभाग व इंडियन ऑईलचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे विविध देशांमधील कारागृह अधिकारी यावेळी उपस्थित होते.



उपस्थितांचे स्वागत करताना अमिताभ गुप्ता म्हणाले की, कारागृहातील बंदीवानांच्या पुनर्वसनासाठी आम्ही विविध उपक्रम राबवित असून त्याअंतर्गत शिक्षण घेणाऱ्या संघाने सुवर्णपदक पटकावल्यामुळे या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

मिखाईन कोरेनमन यावेळी म्हणाले की, येरवडा कारागृहाचे अधिकारी आणि इंडियन ऑइल यांचे चेस फॉर फ्रीडम उपक्रमाबद्दल कौतुक केले पाहिजे. सुवर्णपदक विजेत्या संघाला भेटून आम्ही या परिषदेला प्रारंभ करत आहोत. समाजातील वेगळ्या वर्गात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी इंडियन ऑइल या प्रायोजकांची प्रशंसा केली.

इंडियन ऑइलच्या मनुष्य बळ संचालिका रश्मी गोविल म्हणाल्या की, परिवर्तन प्रिझन टू प्राईड आणि नई दिशा या उपक्रमांना प्रारंभ केला. कारण कोणालाही दुसरी संधी मिळावी अशी आमची इच्छा आहे. तसेच, पुनर्वसनासाठी एक महत्वाचे माध्यम म्हणून क्रिडा क्षेत्राचा उपयोग होऊ शकतो यावर आमचा विश्वास आहे. येरवडा कारागृह व भोपाळ सुधारगृह या संघांनी मिळवलेल्या सुवर्णपदकांमुळे आमच्या उपक्रमाला मोठेच पाठबळ मिळाले आहे. रश्मी गोविल यांनी कारागृहातील आजी माजी बंदिवानांनी चालविलेल्या उम्मीद- ए होप या विक्री केंद्र उपक्रमाची माहिती दिली. तसेच यावेळी फिडे व इंडियन ऑईल आणि येरवडा कारागृहाचा संघ यांच्यात मित्रत्वाचा बुद्धिबळ सामनाही खेळविण्यात आला.

## सूर्या मदर अँड चाईल्ड हॉस्पिटलची 'दूध दान जागरुकता' मोहिम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवजात बालके आणि लहान मुलांसाठी स्तन दूध हा पोषणाचा प्राथमिक व सर्वोच्च स्रोत असतो. बाळाच्या निरोगी वाढीसाठी स्तन दूध आवश्यक असते, त्यामुळे बाळाचे संसर्ग आणि आजारांपासून रक्षण होते. स्तन दूध उपलब्ध नसल्यास दात्याकडून दिले गेलेले दूध हा बाळासाठी दुसरा उत्तम पर्याय असतो.

खासकरून नऊ महिने पूर्ण होण्याआधी जन्मलेली बालके किंवा गंभीर आजारी असलेल्या बाळांसाठी हे दूध खूप उपयुक्त ठरते. सूर्या मदर अँड चाईल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने स्तन दूध दान जागरुकता मोहिमेचे आयोजन केले होते. पुण्यातील सूर्या हॉस्पिटलच्या परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची थीम "दान करण्यात आलेल्या प्रत्येक थेंबामध्ये प्रेम, मिळालेल्या प्रत्येक थेंबामध्ये जीवन". या मोहिमेचे उदघाटन लॅक्टेशन कन्सल्टन्ट डॉ मनिषा खलाने यांनी केले.

स्तन दूध दानाचे महत्त्व अधोरेखित करत दूध दान करणाऱ्या मातांचे कौतुक त्यांनी आपल्या भाषणात केले. बाळाला जन्मापासून पहिल्या सहा महिन्यांपर्यंत आवश्यक असलेली सर्व पोषके, फॅट्स, कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे आणि पाणी हे सर्व घटक स्तन दुधामध्ये मुबलक प्रमाणात असतात. एनएफएचएसच्या अहवालानुसार, फक्त भारतामध्ये फक्त 43% बाळांना पहिले सहा महिने फक्त स्तन दूध पाजले जाते. हार्मोनल समस्या किंवा प्रसुतिनंतर झालेला संसर्ग यामुळे काही मातांना दूध येत नाही.

## राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी झालेल्या एमएचटी-सीईटी या सामायिक प्रवेश परीक्षेत हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील 15 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यामध्ये कावेरी खैरे (97.34), ययाति गोसावी (93.58), स्नेहल कोळेकर (93.04), स्वीटी हलनोर (89.40), समीक्षा रावनकोळे (89.26) या नियमित बॅचमधील विद्यार्थ्यांसह विशेष मार्गदर्शन वर्गातील ईश्वरी लिंभोरे (96.11), जॅकी मणियार (96.27), सनी भोसकर (95.86), ऋतुजा बोंबले (95.72), हर्षल आरुडे (94.90),मानसी आवारी (94.70), सानिका वाघोले (94.43), आदिती आवारी (93.70), नंदिनी पवार (92.60) लौकिक राठोड (91.66) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.




त्यांच्या या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड.बाळासाहेब लिंभोरे यांनी यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करून अभिनंदन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य प्रा.विठ्ठल दौंडकर, प्रा. पी.पी.चव्हाण, प्रा.एस.टी.फुंदे, प्रा.गिताराम टाकळकर आणि पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करताना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वर्षापासून अकरावीपासूनच नियमित विद्यार्थ्यांसाठी सीईटी परीक्षेची विशेष तयारी करून घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

पालक यशवंत खैरे यांनी विद्यार्थ्यांना नियमित अध्यापनासोबत सीईटीपरीक्षेच्या विशेष मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.मनीषा साबळे यांनी केले.

## दै. आरंभ पर्व इफेक्ट




पुणे जिल्हा परिषदेसमोर साचले तळे अशा मथळ्याखाली दै. आरंभपर्वमध्ये बातमी प्रकाशित झाली होती. त्यावर मनपा प्रशासनाकडून दखल घेत दुरुस्ती करण्यात आली.

## धरण संवर्धन उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नैसगिक संसाधनांचे जतन करण्याच्या उपक्रमांतर्गत रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीने पुण्यातील गो ग्रीन एनजीओसोबत सहयोगाने फेज3, हिंजवडीच्या डोंगरामध्ये असलेल्या रिहेगाव धरणावर धरण संवर्धन उपक्रम हाती घेतला. या समुदाय-केंद्रित उपक्रमाचा जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शाश्वतता व पर्यावरणीय संवर्धनाप्रती जागरूकतेचा प्रसार करण्याचा उद्देश होता.

रायन इंटरनॅशनल अकॅडमी हिंजवडी शाखा प्लास्टिक रिसायकलिंग, प्लोगॅथन इत्यादी सारख्या सहयोगात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेचा प्रसार करण्यात साह्यभूत राहिली आहे.

या उपक्रमामध्ये 20 स्वयंसेवकांसह पालक व शाळेचे शिक्षकवर्ग, तसेच एनजीओच्या नि:स्वार्थ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. फावडे-कुदळ हातात घेऊन त्यांनी गोण्यांमध्ये माती भरण्यास आणि स्थानिक धरणाला आधार देणारी भिंत तयार करण्यास मदत केली.

# ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस भारतात लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बीएमडब्ल्यू मोटोर्राड इंडियाने इंडियामध्ये ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस लाँच केली आहे. ही ॲडवेन्चर मोटरसायकल कम्प्लीटली बिल्ट-अप युनिट (CBU) म्हणून उपलब्ध असेल आणि ह्या बाईकच्या विक्रीला जून 2024 च्या अखेरपर्यंत सुरुवात होईल. ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस ची इंट्रोडक्टरी एक्स-शोरूम किंमत रु. 20,95,000 इतकी आहे. बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस लाइट व्हाइट मेटलिकमध्ये बेस, पर्यायी स्टाइल्स - ट्रिपल ब्लॅक ब्लॅकस्टॉर्म मेटलिक पेंटवर्कमध्ये उपलब्ध आहे; बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष श्री.विक्रम पावाह म्हणाले, बीएमडब्ल्यू मोटोर्राडनेआर 80 जी एस सह चार दशकांपूव टूरिंग एण्ड्युरोजचा नवीन विभाग



स्थापित केला. आणि तेव्हापासून बॉक्सर इंजिन असलेली बीएमडब्ल्यू जीएस स्पर्धात्मक क्षेत्रात अग्रस्थानी राहिली आहे. ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएससह, बीएमडब्ल्यू मोटोर्राडने जीएस ला अधिक सर्वोत्तम करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या मोटरसायकलमध्ये शक्ती, आरामदायीपणा व गतीशीलतेचे परिपूर्ण संयोजन आहे, ज्यामुळे ही कोणत्याही प्रदेशात राइडिंगसाठी अनुकूल मोटरसायकल आहे. वैविध्यता आणि आकर्षकतेसह ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस उच्च अपेक्षांच्या देखील पुढे जाईल. ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस मध्ये पूर्णत: नवीन डिझाइन आहे, जी पारंपारिक जीएस आयकॉन्सवर आधारित आहे, तसेच त्यामधून अत्यंत सुसंगता आणि कमी झालेले वजन दिसून येते. मोठ्या प्रमाणात फ्लॅटर टँक रॅम्पसह फ्लायलाइनमधून या मोटरसायकलची डायनॅमिक, हलकी-फुलकी व लक्षवेधक आकर्षकता दिसून येते. ॲल्युमिनिअम फ्यूएल टँकवर अपहोल्स्टरी सेंटर कव्हर कायम राखण्यासह सीटलाजीएस विशिष्ट एण्ड्युरो-स्टाइल सिल्हूट देण्यात आले आहे. लक्षवेधक ब्रेकसह डिझाइनमध्ये नवीन एलईडी मॅट्रिक्स हेडलाइट्स आहेत. सिंगल प्रोजेक्टर युनिटमध्ये हाय बीम व लो बीमचे एकीकरण जीएस हेडलॅम्पच्या प्रतिष्ठित पृष्ठभागाला नवीन रूप देते. सर्व पर्यायी स्टाइल्समध्ये हेडलाइट प्रो उपलब्ध असण्यासह मॅट्रिक्स फुल एलईडी हेडलॅम्पची बीम बँकिंग पोझीशननुसार बेंड होते. . स्पोट, स्लिमलाइन पॅसेंटर सीट, तसेच कार्यक्षम स्पोर्टस् ग्रॅब हँडल ब्रिज मागील बाजूस काहीसे वरील बाजूने सीट आकार देत असले तरी प्रवासीला आरामदायी सीटिंगची खात्री देते. मुलभूत व्हर्जनमध्ये प्रमाणित राइडरच्या सीटची उंची 850 मिमी आहे आणि त्यामध्ये द्वि-स्तरीय कव्हर बसवण्यात आले आहे, जे फ्यूएल फिलर कॅपपासून पॅसेंजर सीटपर्यंत हलक्या ग्रे टेक्स्चरमध्ये आहे. ऑल-न्यू बीएमडब्ल्यू आर 1300 जीएस मध्ये प्रमाणित म्हणून इक्विपमेंट वैशिष्ट्य कनेक्टीव्हीटी, तसेच 6 . 5 -इंच फुल-कलर टीएफटी स्क्रिन आहे. एकीकृत कार्यसंचालनासह स्टॅण्डर्ड बीएमडब्ल्यू मोटोर्राड मल्टी-कंट्रोलरशी संलग्न राहत ही मोटरसायकल राइडरला जलदपणे वेईकल व कनेक्टीव्हीटी फंक्शन्स उपलब्ध करून देते.

प्रमाणित कम्फर्ट पॅकेजमध्ये सेंटर स्टॅण्ड, ॲडजस्टेबल विंडस्क्रिनसह हाय विंडशील्ड, कॉकपीट ट्रिम व विंड डिफ्लेक्टर, पॅसेंजर किटसह कम्फर्ट पॅसेंजर सीट, कम्फर्ट पॅसेंजर रेस्ट आणि लगेज कॅरियर आहे. टूरिंग पॅकेज फक्त ऑप्शन स्टाइल्ससह उपलब्ध आहे, ज्यामध्ये सेंट्रल लॉकिंग, प्रीपरेशन फॉर नेव्हिगेशन, क्रोम-प्लेटेड मॅनिफोल्ड, लेफ्ट व राइड केसहोल्डर, हँड प्रोटेक्टर एक्स्टेंशन आणि टॉपकेस होल्डर आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.